पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११०१८.
क प्रभाग समिती सभा
कार्यपत्रिका क्रमांक- ३
स भा वृ त्तां त

दिनांक ४/१०/२०१७ वेळ-दुपारी १२.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. "क" प्रभाग समिती मासिक सभा बुधवार दि.४/१०/२०१७ रोजी **दुपारी १२.००** वाजता क क्षेत्रीय कार्यालयातील श्री.छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजीत करणेत आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१) मा.अश्विनी संतोष जाधव सभापती
२) मा.सारीका शिवाजी सस्ते
३) मा. राहुल गुलाब जाधव
४) मा.वसंत प्रभाकर बोराटे
५) मा.बोइनवाड यशोदा प्रकाश
६) मा.लांडगे सारिका संतोष
७) मा.लांडगे रवि लक्ष्मण
८) मा.लांडगे राजेंद्र किसनराव
९) मा.मडिगेरी विलास हनुमंतराव
१०) मा.लांडे विक्रांत विलास
११) मा.गीता सुशिल मंचरकर
१२) मा.राहुल हनुमंतराव भोसले
१३) मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर
१४) मा.समीर मोरेश्वर मासुळकर

याशिवाय मा.अण्णा बोदडे- क्षेत्रीय अधिकारी क क्षेत्रीय कार्यालय, मा.संजय घुबे-कार्यकारी अभियंता स्थापत्य, मा.संजय भोसले- उपअभियंता जलनिस्सारण, मा.नितीन देशमुख- प्र.कार्यकारी अभियंता विदयुत,मा.रामकिसन लटपटे- प्रशासन अधिकारी, मा.दवंडे- उपअभियंता पापु, मा. शिंदे, वायकर- उपअभियंता स्थापत्य,मा.बी.बी.कांबळे- सहा.आरोग्याधिकारी, श्री.वसंत उगले- लेखाधिकारी, हे अधिकारी / कर्मचारी सभेस उपस्थित होते.

-----

उपस्थित सन्मा.सदस्य/ सदस्या अधिकारी / कर्मचारी सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजास सुरुवात करणेत येत आहे.

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत येत आहेत.

विषय क्रमांक- २) सन २०१७-२०१८ चे अंदाजपत्रकामध्ये आरोग्य विषयक कामांकरिता अंतर्गत तरतुद वर्ग करणेबाबत..

विषय क्रमांक-३) नामकरण फलक बसविण्याबाबत- मा.सारीका लांडगे,मा.यशोदा बोइनवाड, यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-४) नामकरण संदर्भात - मा.राहूल भोसले,मा.समीर मासुळकर यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-५) माजी नगरसेवकांचे नामफलक काढणेबाबत- मा.विलास मडिगेरी, मा.समीर मासुळकर यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-६) प्रभाग क्रमांक ६ मधील सर्वे नं.२३ हनुमाननगर भगतवस्ती येथे नवीन नामफलक लावण्यास मंजुरी मिळण्याबाबत-मा.राजेंद्र लांडगे,मा.राहुल जाधव यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक-७) खराळवाडी गांधीनगर मधील गार्डनला कै.हरिश्चंद्र मंचरकर नांव देणेबाबत- मा.गीता मंचरकर,मा.राहुल भोसले यांचा प्रस्ताव.

-----

दिनांक ६/९/२०१७ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक २) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

-----

ठराव क्रमांक - ७                            विषय क्रमांक - १

दिनांक - ४/१०/२०१७                         विभाग-नगररचना व विकास

सुचक-मा.समीर मासुळकर                      अनुमोदक-मा.राहुल भोसले

संदर्भ- मा.आयुक्त यांचेकडील जा.क्र. नरवि/कावि/१५/पिंपरी/२१७/२०१७ दि.०२/०८/२०१७

मा.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे------

मा.फ प्रभाग समिती ठराव क्रमांक ८ दि.०८/०७/२०१६ अन्वये,"प्रभाग क्रमांक २८ मासुळकर कॉलनी येथील भाग अत्याधुनिक सोईने विकसीत होत असून नागरिकांच्या सोईच्या दृष्टीने व मुख्य रस्त्यांवर होणा-या गाडयांच्या वाहतुकीस पर्यायी उपलब्ध्ता होणे अत्यंत गरजेचे आहे.प्रभाग क्र.२८ टेल्को सिमाभिंती लगतचा रस्ता ( W सेक्टर ) ते मोरवाडी आय.टी.आय.रस्ता ( सर्व्हे नं.१३९/१४०) येथील अमृतेश्वर ट्रस्टची जागा) महानगरपालिका अधिनियम २००५ मधील कलम २०५ नुसार नागरिकांच्या सोयीसाठी पर्यायी रस्ता म्हणुन घोषित करणे." याप्रमाणे ठराव मंजुर करणेत आलेला होता. त्यास अनुसरुन उपरोक्त संदर्भ क्र.२ चे मंजुर प्रस्तावान्वये मा.आयुक्त यांनी विषयांकित प्रकरणी कार्यकारी अभियंता ( स्थापत्य विभाग) फ क्षेत्रीय कार्यालय व अमृतेश्वर ट्रस्ट यांचे सहमतीने केलेला पर्यायी रस्ता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २०५ नुसार घोषीत करणे प्रकरणी नागरिकांच्या हरकती / सूचना मागविण्यासाठी दिनांक १७ डिसेंबर २०१६ च्या दै.आज का आनंद, दै.प्रभात व दै.पुण्यनगरी या वृत्तपत्रांमध्ये जाहीर प्रकटण देण्यात आलेले होते.

सदरच्या वृत्तपत्रातील जाहिरातीस अनुसरुन एक हरकत / सूचना उपसंचालक नगररचना पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे १८ यांचे कार्यालयामध्ये प्राप्त झालेली होती.त्यांस

अनुसरुन संबंधित हरकतदारास दिनांक ०१/०६/२०१७ व दि.२२/०६/२०१७ रोजी सुनावणीस बोलावूनही हरकतदार सुनावणीस अनुपस्थित राहिल्याने हरकतदाराची हरकत उपरोक्त संदर्भ ३ अन्वये फेटाळण्यात आलेली आहे.तरी विषयांकित पिंपरी वाघेरे सर्व्हे नं१३९ व १४० मध्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम २०५ नुसार नागरिकांच्या सोईसाठी रस्ता घोषित करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे.सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

**सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक - ८ विषय क्रमांक - २

दिनांक - ४/१०/२०१७ विभाग-

सुचक-मा.समीर मासुळकर अनुमोदक-मा.राहुल भोसले

संदर्भ- मा.क्षेत्रीय अधिकारी क यांचे जा.क्र. कक्षे/आ१५/कावि/८५६/ २०१७ दि.०४/०९/२०१७

मा.क्षेत्रीय अधिकारी क यांनी शिफारस केलेप्रमाणे------

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१७-२०१८ चे मुळ अंदाजपत्रकामध्ये क क्षेत्रीय कार्यालयाकडील आरोग्य विषयक कामांना तरतुद कमी पडत आहे.सदर कामांसाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे अंतर्गत तरतुद वर्ग करणे आवश्यक आहे. क प्रभाग आरोग्य विभागाकडील क्षेत्रीय कार्यालयाकडील आरोग्य विषयक कामांवरील सन २०१७-२०१८ मधील वाढ / घट तरतुद वर्गीकरण तक्ता लेखाशिर्षनिहाय तरतुद कमी अथवा बदली करणेस मान्यता देणेत येत आहे.सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक - ९ विषय क्रमांक - ३

दिनांक - ४/१०/२०१७ विभाग-

सुचक-मा.समीर मासुळकर अनुमोदक-मा.राहुल भोसले

संदर्भ- मा.सारीका लांडगे,मा.यशोदा बोइनवाड यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.६ मधील ठिकठिकाणी जुने नामकरण फलक काढून नवीन नामकरण फलक बसविण्यात यावे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक - १० विषय क्रमांक - ४

दिनांक - ४/१०/२०१७ विभाग-

सुचक- मा.राहूल भोसले अनुमोदक- मा.समीर मासुळकर

संदर्भ- मा.राहूल भोसले,मा.समीर मासुळकर यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्र.९ मधील के.एस.बी.चौकामधील ग्रेड सेपरेटरला **"स्व.आमदार आण्णासाहेब पाटील ग्रेड सेपरेटर"** असे नामकरण करण्यात यावे.सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक - ११ विषय क्रमांक - ५
दिनांक - ४/१०/२०१७ विभाग-
सुचक- मा.विलास मडिगेरी अनुमोदक- मा.समीर मासुळकर
संदर्भ- मा.विलास मडिगेरी,मा.समीर मासुळकर यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड मनपाचे सन २०१७ मध्ये सार्वत्रिक निवडणुकीमध्ये जे सन्मा.सदस्य कार्यरत आहेत त्यांचे नामफलक लावणेत यावे. तसेच जे माजी नगरसेवक आहेत व सध्या कार्यरत नाहीत त्यांचे नामफलक काढणेत यावे. (माजी महापौर यांचे वगळून ) सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक - १२ विषय क्रमांक - ६
दिनांक - ४/१०/२०१७ विभाग-
सुचक- मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक- मा.राहुल जाधव
संदर्भ- मा.राजेंद्र लांडगे,मा.राहुल जाधव यांचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक ६ मधील सर्वे नं.२३ हनुमाननगर भगतवस्ती येथे खालीलप्रमाणे नवीन नामफलक लावण्यास मान्यता देणेत येत आहे.

१) कै.किसनराव सखाराम लांडगे मार्ग नं.१-२ फलक
२) कै.किसनराव सखाराम लांडगे मार्ग नं.२-२ फलक
३) कै.किसनराव सखाराम लांडगे मार्ग नं.३-२ फलक
४) कै.किसनराव सखाराम लांडगे मार्ग नं.४-२ फलक
५) कै.अंकुशराव लांडगे लघु उदयोग मार्ग १ - २ फलक
६) कै.अंकुशराव लांडगे लघु उदयोग मार्ग २- २ फलक
७) कै.अंकुशराव लांडगे लघु उदयोग मार्ग ३- २ फलक
८) कै.अंकुशराव लांडगे लघु उदयोग मार्ग ४ - २ फलक
९) गणेश मंदिर मार्ग नं.१ - २ फलक
१०) गणेश मंदिर मार्ग नं.२ - २ फलक
११) गणेश मंदिर मार्ग नं.३ - २ फलक
१२) गणेश मंदिर मार्ग नं.४ - २ फलक
१३) महाराणा प्रताप मार्ग- २ फलक

सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक - १३ विषय क्रमांक - ७

दिनांक - ४/१०/२०१७ विभाग-

सुचक- मा.राहूल भोसले अनुमोदक- मा.गीता मंचरकर

संदर्भ- मा.राहूल भोसले,मा.गीता मंचरकर यांचा प्रस्ताव.

पिंपरी चिंचवड शहरातील खराळवाडी गांधीनगर प्रभाग क्र ९ मधील गार्डन आहे. त्या गार्डनला **"कै.हरिश्चंद्र मंचरकर"** हे नांव देण्यात यावे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

यानंतर सर्वांचे आभार मानून मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-

(**मा.अश्विनी संतोष जाधव** )

सभापती

क प्रभाग समिती, भोसरी २६.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

क क्षेत्रीय कार्यालय, भोसरी - २६.

क्र-कक्षेका/कावि/ ११/२०१७.

दिनांक- १२/०९/२०१७.



प्रशासन अधिकारी

तथा सचिव सभाशाखा

क प्रभाग समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे

पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.